# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.02.2025** **वारःगुरुवार**

---

- उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्याची समाप्ती; 66 कोटींहून अधिक भाविकांचं पवित्र संगमावर स्नान,

- 2027 मध्ये होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्राधिकरण तयार करण्याचे निर्देश,

- पुणे स्वारगेट बलात्कार प्रकरणी फरार आरोपीचा शोध सुरु,

- वैनगंगा नदीत बुडून चार जणांचा मृत्यु, आणि

- चॅंपियन्स करंडकमध्ये अफगाणिस्तानचा इंग्लंडवर विजय

**<u>महाकुंभ</u>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ मेळा काल समाप्त झाला. मकर संक्रांतीपासून सुरू झालेल्या या महाकुंभामध्ये 66 कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केलं. भारतीय वायु दलानं घाटांवर पुष्पवृष्टि करुन भाविकांना संस्मरणीय आनंद दिला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्व भाविक, संत आणि कल्पवासी यांना शुभेच्छा दिल्या. भाविकांनी संपूर्ण जगाला राष्ट्रीय एकता आणि समर्पणाचा संदेश दिला असल्याचं ते म्हणाले.

महाकुंभ 2025 हा इतिहासातील अध्यात्मिकता आणि मानवी संमेलनाचं एक सर्वात मोठं केंद्र ठरला.

महाकुंभ पर्वात देशाचे सांस्कृतिक बंध दृढ करण्यात प्रसारभारतीनं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत सेहगल यांनी म्हटलं आहे. या पर्वाचे सर्व 48 दिवस चाललेल्या कुंभवाणी वाहिनीमार्फत आकाशवाणीने कोट्यवधी लोकांशी संपर्क साधला. देशाची सार्वजनिक प्रसारण व्यवस्था म्हणून आकाशवाणीनं या उत्सवात चोख कामगिरी बजावली, असं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी

यांनी सांगितलं. तर कुंभवाणीमार्फत कमीतकमी वेळात अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याच्या आकाशवाणीच्या कामगिरीबद्दल महासंचालक प्रज्ञा पालिवाल - गौर यांनीही प्रशंसा केली आहे.

**<u>सिंहस्थकुंभमेळा</u>**

नाशिक-त्र्यंबकेश्वर इथं 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून हा सिंहस्थ कुंभ 'डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ' म्हणून ओळखला जावा, यासाठी नियोजन करावं असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे. या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसंदर्भात काल फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली त्यावेळी ते बोलत होते.

नाशिक त्र्यंबक रस्ता 24 मीटर वाढविणं, रस्त्यांच्या कडेला तंबू गाव उभारणं, नाशिक शहरातील रस्त्यांची कामं, गोदाकाठी रस्ता तयार करण्याची शक्यता, आसपासच्या धार्मिक स्थळांसाठी मार्गिका तयार करण्यावर या बैठकीत विचार करण्यात आला.

**<u>दिव्यांग</u>**

राज्यातील दिव्यांग युवकांना रोजगारासाठी 'युथ फॉर जॉब्स' संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्यातल्या दिव्यांग युवकांना प्रशिक्षण देत, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करत असतानाच, दिव्यांगांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. नोंदणीकृत दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी आगामी पाच वर्षांत युडीआयडी देण्यात येणार असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. 'युथ फॉर जॉब्स' ही संस्था प्राथमिक टप्प्यात विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात शासनास सहकार्य करणार आहे. दिव्यांगांना केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्यशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**<u>सावरकर</u>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची स्वातंत्र्य चळवळीतले योगदान, त्यांची जिद्द, त्याग, धाडस राष्ट्र कधीही विसरू शकत नाही अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्यांना आदरांजली वाहिली. रत्नागिरी आणि नाशिकमधील भगूर इथं स्वातंत्र्यवीर सावरकर यांना आदरांजली वाहण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

पंढरपूर इथंल्या सावरकरप्रेमी मंडळाच्या वतीनं चार दिवस व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलं होतं. सावरकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला मंडळाचे अध्यक्ष मोहन मंगळवेढेकर यांनी पुष्पहार घालून अभिवादन केलं.

**<u>स्वारगेट</u>**

पुण्यात स्वारगेट बस स्थानकात एका बसमध्ये मंगळवारी पहाटे एका तरुणीवर बलात्कार झाला. या प्रकरणातल्या आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची आठ पथकं कार्यरत आहेत. आरोपीवर कठोर कारवाई करण्याची सूचना राज्य सरकारनं पोलिसांना केली आहे. स्थानक प्रमुख आणि आगार व्यवस्थापकांची विभागीय चौकशी करण्याचे तसंच स्वारगेट स्थानकावरचे रक्षक बदलण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

**<u>Intro</u>**

महाशिवरात्रीचा सण काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व मंदिरे आकर्षक रोषणाई आणि फुलांच्या सजावटीने सजली होती. भजन, कीर्तन, पूजा, महाअभिषेक असे विविध धार्मिक कार्यक्रम ठिकठिकाणी आयोजित करण्यात आले होते. अनेक ठिकाणी जत्रा भरल्या होत्या. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**<u>स्क्रिप्ट :</u>**

हर बोला हर हर महादेव 'बम बम भोले' च्या गर्जनाने सर्व शिवमंदिरे दुमदुमन गेली होती.  भगवान शंकराच्या एकंदर १२ ज्योतिर्लिंगांपैकी पुण्याजवळ भीमाशंकर, नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर, वेरुळचं घृष्णेश्वर, हिंगोली जिल्ह्यातलं औंढा नागनाथ आणि बीड जिल्ह्यातल्या परळी इथलं वैजनाथ अशी ५ ज्योतिर्लिंग राज्यात आहेत. पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर इथं महाशिवरात्रीनिमित्त लाखो भाविकांनी हजेरी लावली. मंदिराचा गाभारा आणि परिसर रंगबिरंगी फुलांनी सजविण्यात आला होता, विद्युत रोषणाईनं मंदिर उजळून निघालं होतं. जेजुरीच्या खंडोबा गडावरील शिवलिंग भाविकांना देवदर्शनासाठी खुलं करण्यात होतं. भगवान शिव आणि पार्वती यांच्या विवाहाचा दिवस असलेल्या महाशिवरात्रीनिमित्त आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली.

नाशिकच्या श्री त्रंबकेश्वर महादेव मंदिरासह नाशिकच्या शिव मंदिरांमध्ये मोठी गर्दी झाली होती. श्री त्रंबकेश्वर येथे दर्शन निःशुल्क केल्यामुळे राज्यभरातून भाविक दाखल झाले होते. बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभु वैद्यनाथाच्या परळी नगरीत यात्रा महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली होती. लातूरमध्ये मध्यरात्री गवळी समाजाचा दुग्धाभिषेक झाल्यानंतर भक्तांनी "हर हर महादेव"चा गजर करत श्री सिद्धेश्वरांचे दर्शन घेतले. नांदेड जिल्ह्यातील नागराधाम मंदिरात मध्यप्रदेश, छतीसगड आणि विविध भागातील भाविक आले होते.

सिंधुदुर्ग इथल्या श्री देव कुणकेश्वर मंदिरात पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते शासकीय पूजा करण्यात आली. कुणकेश्वराच्या भेटीसाठी नऊ देवस्वाऱ्या येणार आहेत. यात देवगड-जामसंडेची दिर्बादेवी ही १२ वर्षांनी कुणकेश्वराच्या भेटीला येत असल्याने देवस्वारीच्या पारंपरिक मार्गावर तारामुंबरी खाडीवर होड्यांचा सेतू उभारण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील श्री क्षेत्र रेणावी इथं महाशिवरात्रीनिमित्त भक्तनिवासाचं उद्घाटन आमदार सुहास बाबर यांच्या हस्ते करण्यात आलं. झारखंडमध्ये बारा ज्योतिर्लिंगांपैकी देवघर इथल्या बाबा वैद्यनाथ धाममध्ये भगवान शिवाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण देवघर शहराला रोषणाई आणि सजावट करण्यात आली होती.

श्रीलंकेतल्या पंच ईश्वरम मंदिरांमध्ये महाशिवरात्री साजरी करण्यात आली. श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी श्रीलंकेतल्या हिंदू समुदायाला महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या. अहिल्यानगर , धुळे , रत्नागिरी , बीड , गडचिरोली , नागपूर आदी जिल्ह्यातील शिव मंदिरात मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह प्रशांत जाधव पुणे.

**<u>मराठीभाषागौरव</u>**

मराठी भाषा गौरव दिन आज साजरा होत आहे. मराठी भाषेच्या गौरवार्थ तसंच भाषा आणि साहित्याच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ आज मुंबईतल्या गेटवे ऑफ इंडिया इथं विविध स्पर्धांमधल्या विजेत्यांना मराठी साहित्यासाठीचे पुरस्कार देऊन यावेळी गौरवण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं कविसंमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात देखील मराठी भाषा गौरव दिनाच्या अनुषंगान विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>ग्रामदरबार</u>**

छत्रपती संभाजीनगर विभागात ग्राम-दरबार अंतर्गत 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' हा उपक्रम होणार आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहचविण्यासाठी हा उपक्रम असल्याचं

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितलं. विभागाच्या आठ जिल्ह्यातल्या 76 तालुक्यात प्रत्येकी एका गावात उद्यापासून या उपक्रमाची सुरूवात होणार आहे.

**तुळजाभवानी**

पुरातत्व खात्यानं केलेल्या तुळजाभवानी मंदिराच्या संरचनात्मक परिक्षणाचा अहवाल प्राप्त झाला आहे. देवी मंदिराचं प्राचीन शिखर चुना आणि जुन्या विटांपासून तयार करण्यात आलं आहे. त्यावर नंतरच्या काळात अडीच फूट जाडीचं सिमेंट काँक्रीट आणि दगडांचं आवरण दिल्यामुळं दोन दगडी शिळांना तडे गेले असा निष्कर्ष पुरातत्व विभागानं काढला आहे.

**मधमाशा**

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर इथल्या महादेव मंदिरात पोळ्यामधल्या मधमाशांनी उदबत्त्यांच्या वासामुळं त्रस्त झाल्यानंतर काल अनेकांना चावा घेतला. जखमींना लाखांदूर इथल्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केलं आहे.

तिकडे हिंगोली जिल्ह्याच्या सेनगाव तालुक्यात एका शेतकऱ्यावर आग्या मधमाश्यांनी केलेल्या हल्ल्यात त्याचा मृत्यु झाला. तर त्याचा मुलगा जखमी झाला आहे.

**मृत्यू**

चंद्रपूर जिल्ह्यात तीन सख्या बहिणींचा वैनगंगा नदीत काल बुडून मृत्यू झाला. या तिघीजणी गडचिरोली जिल्ह्यातल्या मार्कंडेश्वर इथं जात असताना व्याहाड गावाजवळ वैनगंगा नदीच्या पात्रात आंघोळ करण्यासाठी उतरल्या. यापैकी लहान बहीण पाण्याच्या प्रवाहात वाहू लागल्यानंतर तिला वाचविण्याचा सर्वांनी प्रयत्न केला, यामध्ये 3 बहिणींचा बुडून मृत्यू झाला. गडचिरोलीमध्ये मार्कंडादेव इथं महाशिवरात्रीच्या यात्रेला आलेल्या एका युवकाचा आंघोळ करीत असताना वैनगंगा नदीत बुडून मृत्यू झाला.

**क्रिकेट**

आयसीसी पुरुषांच्या चॅंपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल लाहोर इथं अफगाणिस्ताननं इंग्लंडवर आठ धावांनी विजय मिळवला. विजयासाठी 326 धावांचं आव्हान पेलताना इंग्लंडचा संघ शेवटच्या चेंडूपर्यंत सर्वबाद 317 धावा

करु शकला. अफगाणिस्तानच्या इब्राहिम झदरान यानं या स्पर्धेतील विक्रमी 177 धावा केल्या. स्पर्धेत अद्याप खातं उघडू न शकलेल्या पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यातील अंतिम गट सामना आज रावळपिंडी इथं होणार आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.